**महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 चे कलम 18 अन्वये आदेश.**

1738

जा.क्र.जिउनि/सावकारी/कअवैध/क.18/आ/2016
कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
औरंगाबाद दिनांक : 30 /03/2016

वाचा :- 1) अर्जदार श्री.सुखबीरसिंग दिवानसिंग चंडोक रा.उस्मानपूरा,औरंगाबाद यांचा तक्रार अर्ज दि.04.07.2015.
2) उपनिबंधक, सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांचा अहवाल दि.08.07.2015.
3) प्राधिकृत अधिकारी यांचा अहवाल दि.7/7/2015
4) गैरअर्जदार श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल यांचे विरुध्द दाखल एफ.आय.आर. दि.01.07.2015
5) एस.आर.खंडागळे पोलीस उपनिरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा औरंगाबाद शहर यांचे पत्र दि.16.02.2016 व त्या सोबत दि.01.07.2015 रोजी गैरअर्जदार क्र.1 यांचे दोन्ही घराचे घर झडती बाबतचे पंचनामे व घर झडती मध्ये जप्त केलेल्या दस्ताची यादी.
6) गैरअर्जदार श्री.शंकर सदाशिवराव भैरव यांनी श्री.एस.आर.खंडागळे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गुन्हे शाखा औरंगाबाद शहर यांचे समक्ष लिहून दिलेला जबाब दि.07.06.2013
7) अर्जदार श्री.सुखबीरसिंग दिवानसिंग चंडोक यांचा आर्ज व सोबतचे रु.100/- च्या प्रतिज्ञापत्रावर दि.04.07.2015 रोजी करुन दिलेले शपथपत्र.
8) या कार्यालयाची महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 कलम 18 अंतर्गत सुनावणी नोटीस दि.27.07.2015, 14.08.2015, 03.09.2015, 09.09.2015
9) या कार्यालयाची दैनिक दिव्य मराठी मध्ये दिलेली जाहिर नोटीस दि.30.09.2015
10) गैरअर्जदार श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल, यांचे त्यांचे अभियोक्ते कमलाकर जे.सुर्यवंशी यांचे मार्फत लेखी म्हणने दि.24.11.2015
11) गैरअर्जदार श्री.शंकर सदाशिव भैरव, यांचा त्यांचे अभियोक्ते कमलाकर जे.सुर्यवंशी यांचे मार्फत चा लेखी युक्तीवाद दि.25.01.2016
12) गैरअर्जदार श्री.अजितसिंग नरेंद्रसिंग छतवाल, यांचा त्यांचे अभियोक्ते कमलाकर जे.सुर्यवंशी यांचे मार्फत चा लेखीयुक्तीवाद दि.29.01.2016.
13) अर्जदार यांचे त्यांचे अभियोक्ते यांचे मार्फत दि.10.08.2015 रोजी दाखल केलेले लेखी म्हणने.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD सत्यमेव जयते DIST. AURANGABAD

श्री.सुखबीरसिंग दिवानसिंग चंडोक
रा.उस्मानपूरा, औरंगाबाद — अर्जदार

**विरुध्द**

1. श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल
   रा.मित्र नगर, औरंगाबाद ता.जि.औरंगाबाद — गैरअर्जदार
2. श्री.शंकर सदाशिवराव भैरव
   रा.शिवनेरी अपार्टमेंट, फ्लॅट न.8
   खडकेश्वर, औरंगाबाद ता.जि.औरंगाबाद.
3. श्री.अजितसिंग नरेंद्रसिंग छतवाल
   रा.प्रितमव्हिला, प्लॉट न.81, ज्योतीनगर
   औरंगाबाद ता.जि.औरंगाबाद

ज्या अर्थी, वाचा 1 अन्वये अर्जदार श्री.सुखबीरसिंग दिवानसिंग चंडोक यानी या कार्यालयात तक्रार अर्ज देऊन त्यात असे नमुद केले की, त्यांची शेती बाभुळगांव चित्तेगांव येथे गट क्र.117 मध्ये 2 एकर आहे. त्यांचा व्यवसाय

गुत्तेदारीचा असून त्यांना पेंमेटची फार आवश्यकता पडल्याने ते गैरअर्जदार श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल उर्फ पपी यांना भेटले. ते ओळखीचे असल्याने सांगीतले की, त्यांना पेमेंटसाठी रु.1.00 लाख ची आवश्यकता आहे. त्यावेळी गैरअर्जदार यांनी सांगीतले की, रक्कम देण्यात येईल. त्यांच्याकडे सावकारीचा परवाना नाही. गैरअर्जदार यांनी सांगीतले की, त्यांच्या मानसाच्या नावावर अर्जदार यांची शेती करून द्यावी लागेल माझ्यावर भरोसा ठेवा. आमचा व्यवसाय भरोशावर चालतो. त्यानुसार अर्जदार यांनी गैरअर्जदार श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल यांचा मानूस शंकर सदाशिवराव भैरव यांच्या नावे दि.01.01.2004 रोजी पैठण तहसिल येथे जाऊन श्री.प्रकाश लक्ष्मण जाधव व विनोद धामचंद पिचोड यांचे समक्ष बाभुळगाव चित्तेगांव गट क्र.117 तील शेतीचे खरेदीखत करून दिले. व रु.1.00 लाख घेतले. जेव्हा पैसे परत करण्यासाठी गैरअर्जदार क्र.2 श्री.शंकर भैरव यांना अर्जदार भेटले व विनंती केली की, व्याजासह किती पैसे झाले मी ते देतो त्यांची शेती त्यांच्या नावावर करून द्या त्या वेळी गैरअर्जदार क्र.2 श्री.शंकर भैरव म्हणाले की, गैरअर्जदार क्र.1 श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल यांच्या म्हण्यानुसार अर्जदार यांची शेती गैरअर्जदार क्र.3 श्री.अजितसिंग नरेंद्रसिंग छतवाल यांच्या नावावर करून दिलेली असून गैरअर्जदार यांचे विरुध्द पहिले साक्षीदार श्री.प्रकाश जाधव यांनी हस्तलिखीत लिहून दिले आहे की, ही शेती गहाण ठेवलेली आहे. त्यामुळे त्यांची फसवणुक झाल्याने व गैरअर्जदार यांनी त्यांची शेती बळकवलेली असल्याने ती परत देऊन न्याय मिळवून द्यावा अशी विनंती अर्जदार यांनी संदर्भ क्र. 1 नुसार केलेली आहे.

ज्या अर्थी, वाचा क्र. 2 नुसार उपनिबंधक सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांनी त्यांचा अहवाल या कार्यालयास सादर केला असून त्यात त्यांनी असे नमुद केले आहे की, प्राधिकृत चौकशी अधिकारी यांचे अहवालात असे नमुद आहे की, प्रस्तुत प्रकरणातील तक्रारदार श्री.सुखबीरसिंग दिवानसिंग चंडोक रा.उस्मानपूरा औरंगाबाद यांनी दिनांक **31/03/2015 अन्वये दिलेली तक्रार** मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत या कार्यालयास प्राप्त नुसार सदर तक्रारी मध्ये असे नमुद केले आहे की, गैरअर्जदार श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल त्यांचा मुलगा अजितसिंग व त्यांचे सोबत काम करणारे श्री.शंकर भैरव हे तिघे 5 ते 30 टक्के व्याजाने पैसे देऊन सावकारीचा व्यवसाय करतात. पैशाच्या बदल्यात कोरे धनादेश व स्टॅम्प घेतात त्यांच्याकडे सावकारी परवाना नाही. ठेकेदारीचा व्यवसाय असल्याने कामाचे पैसे देण्यासाठी अर्जदार यांनी गैरअर्जदार क्र. 1 यांच्याकडून रु.1.00 लाख 5 टक्के व्याजाने घेऊन मौजे बाभुळगांव ता.पैठण गट न.117 मधील 0.81 आर. शेतजमीन गैरअर्जदार क्र. 2 श्री.शंकर सदाशिवराव भैरव यांच्या नावाने खरेदखत करून दिली. त्या नंतर घेतलेले पैसे परत करण्यासाठी गेल्यावर त्यांना कळाले की, त्यांची जमीन गैरअर्जदार क्र. 1 यांनी त्यांचा मुलगा गैरअर्जदार क्र. 3 यांच्या नावावर करून दिली. व परत आल्यास संपुन टाकीन अशी धमकी दिली आहे. या प्रकरणी अर्जदार यांचे फिर्यादी वरून दि.01.07.2015 रोजी जवाहर नगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नबंर TT 3012/2015 कलम 39,45,48 महाराष्ट्र सावकारी अधिनियम 2014 अन्वये गुन्हा दाखल झालेला आहे. सदर

गुन्ह्याचे तपासतानी अमलदार यांनी दि.01.07.2015 रोजी गैरअर्जदार यांचे निवास स्थानी धाड मारुन दस्तऐवज जप्त केले आहे. असे अहवालात नमुद करून प्राधिकृत अधिकारी यांचे अहवालाशी समंती दर्शविलेली आहे.

ज्या अर्थी, वाचा क्र. 3 नुसार प्राधिकृत अधिकारी यांनी त्यांचा अहवाल सादर करून त्यांचे अहवालात असे नमुद केले आहे की, प्रस्तुत प्रकरणातील तक्रारदार श्री.सुखबीरसिंग दिवानसिंग चंडोक रा.उस्मानपूरा औरंगाबाद यांनी दिलेल्या सदर तक्रारी मध्ये असे नमुद केले आहे की, गैरअर्जदार श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल त्यांचा मुलगा अजितसिंग व त्यांचे सोबत काम करणारे श्री.शंकर भैरव हे तिघे 5 ते 30 टक्के व्याजाने पैसे देऊन सावकारीचा व्यवसाय करतात. पैशाच्या बदल्यात कोरे धनादेश व स्टॅम्प घेतात त्यांच्याकडे सावकारी परवाना नाही. ठेकेदारीचा व्यवसाय असल्याने कामाचे पैसे देण्यासाठी अर्जदार यांनी गैरअर्जदार क्र. 1 यांच्याकडून रु.1.00 लाख 5 टक्के व्याजाने घेऊन मौजे बाभुळगांव ता.पैठण गट न.117 मधील 0.81 आर. शेतजमीन श्री.गैरअर्जदार क्र. 2 श्री.शंकर सदाशिवराव भैरव यांच्या नावाने खरेदखत करून दिली. त्या नंतर घेतलेले पैसे परत करण्यासाठी गेल्यावर त्यांना कळाले की, त्यांची जमीन गैरअर्जदार क्र. 1 यांनी त्यांचा मुलगा गैरअर्जदार क्र. 3 यांच्या नावावर करून दिली. व परत आल्यास संपुन टाकीन अशी धमकी दिली आहे. या प्रकरणी अर्जदार यांचे फिर्यादी वरून दि.01.07.2015 रोजी जवाहर नगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नबंर II3012/2015 कलम 39,45,48 महाराष्ट्र सावकारी अधिनियम 2014 अन्वये गुन्हा दाखल झालेला आहे. सदर गुन्ह्याचे तपासतानी अमलदार यांनी दि.01.07.2015 रोजी गैरअर्जदार यांचे निवास स्थानी धाड मारुन दस्तऐवज जप्त केले आहे.

ज्या अर्थी, वाचा क्र. 4 नुसार अर्जदार यांनी पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे जवाहर नगर औरंगाबाद येथे दि.01.07.2015 रोजी फिर्याद दिली असून त्यात या कार्यालयात दिलेल्या संदर्भ क्र. 1 मधील मजकूर नमुद केलेला आहे. त्या नुसार गैरअर्जदार क्र. 1 यांचे विरुध्द जवाहर नगर पोलीस स्टेशन औरंगाबाद शहर येथे महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 अंतर्गत गुन्हा दाखल झालेला आहे.

ज्या अर्थी वाचा क्र. 5 नुसार श्री.एस.आर.खंडागळे पोलीस उपनिरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा औरंगाबाद शहर यांचे पत्र दिनांक 16.02.2016 नुसार गैरअर्जदार क्र. 1 श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल यांचे मित्र नगर येथील व ज्योती नगर येथील घर झडतीत दि.01.07.2015 रोजी जप्त केलेल्या दस्ताची यादी व पंचनाम्याची प्रत या कार्यालयात सादर केलेली आहे. त्या नुसार त्यांचे मित्र नगर येथील घर झडतीत व ज्योती नगर येथील घर झडतीत पुढील प्रमाणे दस्त पोलीस निरीक्षक यांनी ताब्यात घेतलेले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

- मित्र नगर येथील घर झडतीत जप्त केलेल्या दस्ताची यादी

1. खरेदी खत क्र.5359/116 दि.9.11.2004 (छायाप्रत)

2. खरेदी खत क्र. 1973/118 दि.01.04.2006 (छायाप्रत)

3. फेरफार होणे बाबत शंकर भैरव यांचा अर्ज दि.13.07.2000 (छायाप्रत)

4. खरेदी खत क्र. 3797 दि.07.11.1997

5. सातबारा बाभुळगांव गट क्र.7 उत्तारा (छायापत)

- ज्योती नगर येथील घर झडतीत जप्त केलेल्या दस्ताची यादी

1. मुद्राक क्र.2924 दि.12.08.2003

2. खरेदी खत क्र.4381/119 दि18.05.2011 (छायाप्रत)

3. खरेदी खत क्र.1535 दि.06.06.1995 (छायाप्रत)

4. डीड ऑफ ॲग्रीमेंट 2648/1/9 दि.26.06.2005 (छायाप्रत)

5. खरेदी खत क्र. 715 दि.30.12.1991 (छायाप्रत)

6. खरेदी खत प्लॉटचे दि.27.10.1994 (श्री.विरपालसिंग छायाप्रत)

7. प्लॉटचे खरेदीखत दि.27.10.1994 (श्री.निरपालसिंग छायाप्रत)

8. इसार पावती मुद्रांक क्र.5156 दि.24.04.1995 श्री.संजय कराळे

9. इसार पावती मुद्राकं क्र.5153 संजय कराळे

10. नोटरी दि.28.11.2013 श्री.शिवाजी बुट्टे, छायाप्रत

11. खरेदी खत क्र.3309 दि.01.09.1999 छायाप्रत

12. खरेदी खत क्र.3796 दि.07.11.1997 छायाप्रत

13. खरेदी खत मुद्रांक क्र.24229 दि.07.09.1989

14. आखीव पत्रिका सी.टी.स.न.16271 श्री.एरेशा नारायण

15. इसार पावती मुद्रांक क्र.4823 दि.06.04.1998

16. भरणा पावती मुद्रांक क्र.2916 दि.17.04.1998

17. सात बारा उत्तारा शहानूरवाडी गट न.18/2

18. आखीव पत्रिका सी.टी.सर्व्हे न.16910/अ-5 श्री सिताराम अग्रवाल.

19. युनियन बँक शाखा न्यु उस्मानपूरा औरंगाबाद धनादेश क्र.029471

20. बँक पासबूक दि.ठाणे जनता सहकारी बँक खाते क्र.775 B/22

21. बँक पासबूक एस.बी.आय.A/C 32795489906

22. बँक पासबूक एस.बी.आय.A/C 31359343020

23. बँक पासबूक एच.डी.एफ.सी.A/C 50100041408298

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD

24. पेइंग स्लिप ICICI बँक  A/C 004401517993

25. चेक बुक पंजाब अॅण्ड सिंध बँक A/C 53027

26. चेक बुक ICICI बँक A/C 004401517993

27. चेक बुक ICICI बँक A/C 004401517993

28. चेक बुक SBI बँक A/C 32795489906

29. चेक बुक TJSB बँक A/C/ 077010000000022

30. सन 2002 रोजनिशी

31. मनजीतसिंग नोटबुक

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD DIST. AURANGABAD

32. [illegible] करार नामा

1. अमरसिंग राठोड दि.01.08.2013
2. सौ.संगीता भारती दि.15.12.2013
3. गोरखनाथ दिघे दि.01.06.2009
4. शाम अमि सिंधी दि.01.01.2012
5. मन्नु भारद्वाज दि.01.08.2005
6. आंबादास हिवाळे दि.30.06.2013
7. सतिष अग्रवाल दि.26.01.2013
8. मुकुंद धोटे दि.01.11.2006
9. विजय सराफ दि.01.09.2003
10. गोपाळ भासर दि.01.07.2007
11. प्रभाकर मुसळे दि.01.06.2009
12. आंबादास ज्योशी दि.01.06.2013
13. उल्हास नरवडे दि.17.12.2010
14. रमेश पाटील दि.09.06.2003
15. राजु गुप्ता दि.20.04.2003
16. विकास शर्मा दि.06.08.2003
17. सहदेव गोसावी दि.10.09.2008
18. डॉ.सतिष केशवराव दि.01.04.2008
19. सौरदीप वैद्य दि.30.02.2003

20. दिनेश हिरालाल दि.6.12.2004

21. किशोर नानकराम दि.04.04.2003

22. डी.डब्ल्यु ठाकरे दि.01.06.2008

23. विशाल इंगळे दि.06.02.2009

24. चंद्रप्रकाश दि.26.01.2009

25. प्रविणकुमार हिवराळे दि.26.05.2004

26. शिवकुमार जगन्नाथ दि.01.08.2002

27. सुवर्णलता हिरालाल दि.20.09.2006

28. आर.सी.शर्मा दि.01.08.2005

29. प्रशांत कामत दि.13.01.2008

30. रविंद्र दहाडे दि.10.10.2008

31. डॉ.अविनाश बंब दि.01.03.2011

32. कृष्णराव कायम ख नि दि.01.06.2009

33. प्रितपाल सिंग दि.04.11.2011

34. डॉ.अविनाश बंब दि.01.03.2011

REGISTRAR OF MONEYLENDERS * DIST. AURANGABAD *

ज्या अर्थी, वाचा क्र. 6 नुसार गैरअर्जदार क्र. 2 यानी दि.07.06.2013 रोजी तपास अधिकारी श्री.एस.आर.खंडागळे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गुन्हे शाखा औरंगाबाद यांचे समक्ष दि.07.06.2013 रोजी असा जबाब लिहून दिला आहे की, ते शिवनेरी अपार्टमेंट, फ्लॅट न. 8 खडकेश्वर ,औरंगाबाद मो.न.9422293554 येथील रहिवाशी असून त्यांची पत्नी सौ.उषा शंकर भैरव ह्या शासकिय वैद्यकिय महाविद्यालय तथा रुग्णालय घाटी औरगाबाद येथे वार्ड इनचार्ज या पदावरुन सेवानिवृत्त झाल्या आहे. ते काहीही कामधंदा करीत नसुन पत्नीच्या सेवानिवृत्तीच्या वेतनावर व मुलगा करीत असलेल्या खाजगी कंपनीतील नोकरीच्या उत्पन्नावर त्यांची व त्यांच्या कुटुंबाची उपजिवीका चालवितात. त्यांना उत्पन्नाचे इतर ठोस साधन नाही. अर्जदार श्री.सुखबीरसिंग दिवानसिंग चंडोक यांचे अर्जा नुसार त्यांनी जबाबात सांगितले की, गैरअर्जदार श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल (पपी) यांचा सावकारीचा व्यवसाय आहे. ते औरंगाबाद शहरातील गरजू लोकाना व्याजाने पैसे देतात ते त्यांचे चांगले मित्र आहेत. अर्जदार यांना पैशाची गरज असल्यामुळे त्यांनी गैरअर्जदार क्र. 1 यांचेकडून रु.1.00 लाख द.सा.द.शे.5 रु. प्रमाणे व्याजाने घेतले होते. त्या बदल्यात अर्जदार यांनी त्यांची बाभुळगांव ता.पैठण येथील गट नं.117 मधील 2 एकर शेतजमीनीचे खरेदीखत क्र.5359/2004 दि.10.11.2004 नुसार त्यांच्या नावाने करुन घेतले होते. व सदरचे खरेदीखत हे गैरअर्जदार क्र. 1 श्री.नरेंद्रसिंग छतवाल यांनी अर्जदार श्री.सुखबीरसिंग चंडोक यांना रु.1.00 लाख व्याजाने दिलेल्या पैशाच्या मोबदल्यात

करुन घेतले होते. खरेदीखत करून घेताना अर्जदार हे घेतलेली रु.1.00 लाख मुळ रक्कम व्याजासह त्यांचा मित्र गैरअर्जदार श्री.नरेंद्रसिंग छतवाल यांना परत करतील त्यावेळी सदर जमीनीचे खरेदीखत अर्जदार यांचे नावाने करुन देण्याचे ठरले होते. अर्जदार यांनी घेतलेल्या रु.1.00 लाख रक्कमे पेकी व्याजासह गैरअर्जदार यांना किती रक्कम परत केली हे त्यांना सांगता येणार नाही परंतु त्यांचे मित्र गैरअर्जदार यांनी त्यांना सांगीतले की, अर्जदार हे वेळेवर पैसे देत नसल्याने सदरची जमीन त्यांचा मुलगा गैरअर्जदार क्र. 3 श्री.नरेंद्रसिंग अजितसिंग छतवाल यांच्या नावाने करुन देण्यास सांगीतल्याने सदर जमीन खरेदीखत क्र.1973/2006 दि.01.04.2006 अन्वये करून दिलेली आहे. खरेदीखतामध्ये जमीनीची किमंत नावापूरती दाखविलेली आहे. प्रत्यक्षात त्यांनी जमीनीचा मोबदला घेतलेला नाही. कारण ह्या जमीनीचे [illegible] गैरअर्जदार क्र. 1 यांच्या सांगीतल्या नुसार अर्जदार यांच्या जमीनीचे खरेदीखत त्यांच्या नावाने करुन घेतले होते. त्यावेळी सुध्दा खरेदीखतात नमुद केलेली जमीनीची रक्कम त्यांनी दिलेली नाही. अर्जदार श्री.सुखबीरसिंग दिवानसिंग चंडोक यांच्या मालकीच्या मौजे बाभुळगांव ता.पैठण येथील गट नं.117 मधील 2 एकर जमीनीची खरेदीखत हे सावकारी व्यवहारातुन झालेले आहे. प्रत्यक्षात जमीनीचा मोबदला त्यांनी घेतलेला नाही. सदर खरेदीखत हे दुय्यम निबंधक पैठण यांच्या कार्यालयात नोंदविलेले आहे. अर्जदार यांनी गैरअर्जदार क्र. 1 यांच्याकडून रु.1.00 लाख व्याजाने घेतले होते. व्याजाने घेतलेल्या पैशाचा व्यवहार हा औरंगाबाद येथे घडलेला आहे. नमुद जमीनीशी त्यांचा सबंध नाही. गैरअर्जदार क्र.1 यांच्या सांगीतल्या नुसार जमीन त्यांच्या नावाने करून घेतली होती. व त्यांच्या सांगीतल्या वरुन त्यांचा मुलगा गैरअर्जदार क्र. 3 यांच्या नावाने जमीन करुन दिलेली आहे असा जबाब सादर केलेला आहे.

ज्या अर्थी वाचा क्र. 7 नुसार अर्जदार यांनी अर्ज देऊन सोबत रु.100/- च्या प्रतिज्ञापत्रावर वाचा क्र. 1 नुसार दिलेल्या तक्रारीतील मजकुर नमुद करून त्यांची मौजे बाभुळगाव-चित्तेगांव ता.पैठण शिवारातील गट न.117 मधील जमीन सावकारी मध्ये गहाण खते केल्या बाबत घोषीत करून जमीन परत करणे बाबत विनंती केलेली आहे.

ज्या अर्थी, वाचा क्र. 7 नुसार त्यांचा जमीन परत मिळणे बाबतचा अर्ज प्राप्त झालेला असल्याने संदर्भिय मागणी अर्जा नुसार या कार्यालयात दि.24.07.2015, 06.08.2015, 11.08.2015, 28.08.2015, 31.08.2015, 08.09.2015, 23.09.2015, 07.10.2015, 19.10.215, 27.10.2015, 03.11.2015, 19.11.2015, 24.11.2015, 30.11.2015, 15.12.2015, 17.12.2015, 05.01.2016, 20.01.2016, 22.01.2016, 25.01.2016, 29.01.2016 रोजी सुनावणी घेण्यात आल्या.

दि.06.08.2015 च्या सुनावणीस गैरअर्जदार क्र. 2 यांच्या वतीने ॲड.के.जे.सुर्यवंशी यांनी वकील पत्र दाखल केले. तसेच अर्जदार यांचे वतीने ॲड.ए.के.शेळके हजर होऊन त्यांनी विनंती केली की, त्यांना कलम 18 खालील दावा दाखल कामी वेळ देण्यात यावा. अशी विनंती केली. तद्नंतरच्या सुनावणीस गैरअर्जदार क्र. 1 हजर न झाल्याने त्यांना शेवटची संधी म्हणून दि.23.09.2015 च्या सुनावणीत असे ठरले की, या बाबत दैनिक वर्तमान पत्रात जाहिर प्रगटन देऊन पुढील सुनावणी दि.07.10.2015 रोजी ठेवण्यात आली. त्या नुसार दि.23.09.2015 रोजीचे जाहिर प्रगटन

दि.30/09/2015 रोजी दैनिक दिव्यमराठी या वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यांत आले. सदर जाहिर प्रगटनात नमुद केले की, अर्जदार श्री.सुखबिरसिंग दिवानसिंग चंडोक यांनी गैरअर्जदार क्र.1 श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल व गैरअर्जदार क्र. 3 अजितसिंग नरेंद्रसिंग छतवाल यांचे विरुध्दात महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 चे कलम 18 अंतर्गत खरेदीखत क्र. 5359/2004 दि.09.11.2004 मौजे बाभुळगांव ता.पैठण जि.औरंगाबाद येथील जमीन गट न.117 मधील 0.81 आर.जमीनीचे खरेदीखत गैरअर्जदाराकडे सावकारी व्यवहारा मध्ये गहाण खत करून दिले म्हणून सदरचे खरेदीखत रद्द घोषीत करणे बाबत सावकाराचे निबंधक म्हणून या कार्यालयाकडे दावा क्र.3/15 दाखल केला आहे. सदर दाव्याच्या सुनावणीसाठी वरील गैरअर्जदार 1 व गैरअर्जदार क्र.3 दोघे वारंवार नोटीस/संधी देऊन देखील सतत गैरहजर आहेत. सबब, सदर गैरअर्जदार यांना शेवटची संधी म्हणून दैनिक वर्तमान पत्राद्वारे जाहिर नोटीस देऊन पुढील सुनावणीच्या तारखेस बोलाविण्यात यावे असे दिनांक 23.09.2015 च्या सुनावणी दरम्यान निश्चित केले. त्या नुसार गैरअर्जदार क्र. 1 व गैरअर्जदार क्र. 3 यांना जाहिर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत आले की, या प्रकरणी त्यांनी स्वत: अथवा त्यांचे अभियोक्त्या मार्फत सदर दाव्यात म्हणने मांडण्यासाठी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था औरंगाबाद यांचे कार्यालयात दिनांक 07.10.2015 रोजी दुपारी 3.00 वाजता ठेवण्यात आलेल्या सुनावणीस उपस्थित राहून म्हणने सादर करावे. उपस्थित राहून म्हणने सादर केले नाही तर या प्रकरणात त्यांना काहीही एक म्हणायचे नाही असे गृहीत धरुन एक तर्फी निर्णय घेण्यात येईल असे जाहिर नोटीसीद्वारे दिनांक 30/09/2015 चे दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेले आहे.

या प्रकरणी दि.07.10.2015 च्या ऐवजी दि.19.10.2015 रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी गैरअर्जदार क्र. 1 याना या प्रकरणात हजर राहाणे कामी काही कालावधी दिला जावा म्हणून अर्ज गैरअर्जदार क्र. 3 चे वकील ॲड बिपीनचंद्र केशवराव पाटील यांचे मार्फत सादर केला. यावर अर्जदार यांचे वकील ॲड.ए.ए.शेळके यांनी वेळ देण्यास हरकत नसल्याचे नमुद केले. दि.24.11.2015 च्या सुनावणी दरम्यान गैरअर्जदार क्र. 2 यांनी त्यांचे लेखी म्हणने त्यांचे वकील यांचे मार्फत सादर केले. गैरअर्जदार क्र. 3 यांच्या आजीचे निधन झाल्या कारणाने लेखी म्हणने मांडण्यास वेळ वाढवून द्यावा अशी विनंती केली. त्या नुसार दि.30.11.2015 च्या सुनावणी दरम्यान गैरअर्जदार क्र. 3 यांच्या वतीने त्यांचे अभियोक्ते बीपीनचंद्र के.पाटील यांनी लेखी म्हणने सादर केले. दि.15.12.2015 च्या सुनावणी दरम्यान गैरअर्जदार क्र. 1 यांच्या वतीने त्यांचे अभियोक्ते ॲड.एम.आर.चौधरी यांनी त्यांचे लेखी म्हणने सादर केले. त्या नुसार त्यांचा लेखी युक्तीवाद ग्राह्य धरुन अर्जदार यांचे वकील यांनी यावर तोंडी म्हणने मांडण्या करीता तयार असल्याचे सांगीतले. त्या नुसार अर्जदार व गैरअर्जदार यांनी युक्तीवादासाठी पुर्ण दिवस द्यावा अशी विनंती केली.

त्या नुसार दि.22.01.2016 रोजी अर्जदार यांनी युक्तीवाद केला की, अर्जा सोबत लेखी म्हणने दाखल व या प्रकरणी सबळ पुरावे दाखल आहे. व त्या वरुन सदरचे खरेदीखत झाले आहे आणि गैरअर्जदार क्र. 1 यांचेवर याच

प्रकरणात सावकारी अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. म्हणून सदरचे खरेदीखत गहाण खत म्हणुन अवैध घोषीत करून सदर शेतजमीन त्यांना परत करणे बाबत विनंती केली आहे.

यावर गैरअर्जदार यांच्या तर्फे अॅड.चौधरी यांनी म्हणने मांडले की, अर्जदाराने दाखल केलेला अर्ज मेंटेनेबल नाही. कारण प्रतिवादी क्र. 1 यांनी अर्जदाराची जमीन खरेदी केलेली नाही आणि कोणताही व्यवहार गैरअर्जदार क्र.1 व अर्जदार यांच्यात झालेला नाही म्हणून हा दावा मेंटेनेबल नाही. तसेच अर्जदाराने दाखल केलेला अर्ज हा मुदतीत नाही कारण अर्जदाराने गैरअर्जदार क्र. 2 यांना सन 2004 मध्ये जमीन विकली आहे. व सदरील अर्ज हा सन 2015 मध्ये दाखल केला. तो अर्ज 11 वर्षा नंतर दाखल केलेला आहे. तसेच उशिर झाल्या बदल अर्जदाराने त्यांच्या अर्जात काहीही उल्लेख केलेला नाही. म्हणून दावा मुदतीत नाही तसेच सदर अर्ज दाखल करणे पूर्वी चौकशी झालेली नाही. महाराष्ट्र सावकारी कायद्याचे कलम 15 व 16 अंतर्गत चौकशी झालेली नाही. अर्जदार यांनी प्रतिवादी क्र. 2 यांना दि.10.11.2004 रोजी जमीनीचे नोंदणीकृत खरेदीखत करून दिलेले व त्यांचे संपूर्ण पैसे अर्जदार यांना मिळालेले आहे. व सदरील खरेदीखतात कोणतीही शर्थ टाकलेली नाही. खरेदीखतात सावकारी बाबत उल्लेख नाही. प्रतिवादी वादी क्र. 2 हे सदरील जमीनीचे मालक व ताबेदार असल्यामुळे त्यांचे नावाची 7/12 व फेरफारला नोंद झाली आहे. त्या नंतर प्रतीवादी क्र. 2 यांनी सदरील जमीन प्रतिवादी क्र. 3 यांना सन 2006 मध्ये विकली त्याचे नोंदणीकृत खरेदीखत झालेले आहे. तसेच प्रतिवादी क्र. 1 यांना मुदाम त्रास देण्याच्या हेतुने व त्याची हरासमेंट व्हावी म्हणून अर्जदार यांनी मा.मुख्य दंडाधिकारी न्यायाधिश साहेब यांच्याकडे दि.24.07.2013 ची तक्रार दि.31.07.213 रोजी दाखल केली. व आरोप केला की, जे काही खरेदीखत झालेले आहे ते सावकारीत झालेले आहे. व इतर आरोपही केलेला आहे. त्या तक्रारीच्या अनुषंगाने मा.मुख्य न्यायाधिश साहेबानी पोलीसाना निर्देशीत केले की, सदर प्रकरणा बाबत चौकशी करावी. व त्यांचा अहवाल सादर करण्यात यावा. त्या नुसार पोलीसानी सदर प्रकरणात चौकशी केली. तसेच अर्जदार व गैरअर्जदार यांचे जबाब नोंदवून घेतले. संपूर्ण कागदपत्राची पडताळणी केली. व दि.03.10.2013 रोजी मा.न्यायाधिशाकडे चौकशी अहवाल सादर केला. त्या मध्ये त्यांनी अहवालात असे म्हणले की, प्रतिवादी यांची सावकारी व्यवसाय बदल कुठलाही पुरावा नसुन यात गैरअर्जदार यांची चुक दिसून येत नाही व तसेच संपूर्ण वाद हा दिवानी स्वरुपाचा जमीन देणे घेणे संदर्भात असून दिवानी कोर्टात दाद मागावी. अशी लेखी समज दिली व अहवाल सादर केला. पोलीसानी सादर केलेल्या अहवाला विरुध्द अर्जदार यांनी कोणत्याही न्यायालयात दाद मागीतलेली नाही. त्या नंतर अर्जदार यांनी पुन्हा दुसरी तक्रार दि.12.02.2014 रोजी मा.ना.श्री.आर.आर.पाटील, गृहमंत्री मुंबई यांच्याकडे दाखल केली. व पुर्वीच्या तक्रारीतील आरोप जसेच्या तसे केले. सदरील तक्रारीच्या अनुषंगाने मा.मंत्री मोहदय यांनी सदरील प्रकरणात चौकशी करावी असे पोलीसाना निर्देशीत केले. त्या नंतर पोलीसानी चौकशी केली. अर्जदार व गैरअर्जदार यांचे जबाब घेतले. कागदपत्राची पडताळणी केली. व दि.21.02.2014 रोजी अहवाल सादर केला. सदर अहवालात असे नमुद केले की, सावकारकी बाबत जमीन हडप केल्या बाबत गुन्हा सिध्द होत नाही. असा अहवाला पोलीस आयुक्त यांच्याकडे सादर केला. त्यानंतर

पुन्हा अर्जदार यांनी दि.01.07.2015 रोजी जवाहर नगर पोलीस स्टेशन येथे तक्रार केली व पुर्वी दिलेल्या तक्रारीतील आरोप हे या तक्रारीत केले व त्या नंतर प्रतिवादी क्र. 1 व 2 यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्हा नोंद झाल्या नंतर प्रतिवादी क्र. 1 यांनी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद येथे क्रिमीनल अप्लीकेशन न.6133/2015 एफ.आर.आय.रद्द होणेसाठी दाखल केले. त्या नंतर मा.उच्च न्यायालय यांनी नोटीस काढून अंतरीम आदेश पारीत केला की, प्रकरणाची अंतीम सुनावणी होई पर्यंत आरोप पत्र दाखल करू नये. तसेच प्रतिवादी क्र. 1व सदरील प्रापर्टीचा काहीही संबंध नाही. फक्त प्रतीवादी क्र. 3 हा प्रतिवादी क्र. 1 यांचा मुलगा असल्याने व त्यांनी मालमत्ता प्रतिवादी क्र. 2 यांचेकडून खरेदी केल्यामुळे हे खोटे आरोप केले आहे. व वेगवेगळ्या ठिकाणी खोट्या तक्रारी केल्या आहे. प्रतिवादी क्र. 3 हे 10 ते 15 वर्षा पासून प्रतिवादी क्र. 1 यांच्या पासून वेगळे राहातात. तसेच त्यांचा प्रस्तुत प्रकरणात दिलेला पत्ता वेगवेगळा आहेत. तसेच प्रतिवादी क्र. 3 यांनी स्वतःच्या कमाईच्या पैशातुन सदर मालमत्ता खरेदी केली आहे. जो काही व्यवहार प्रतिवादी क्र. 2 व 3 यांच्यात झालेला आहे त्यामध्ये प्रतिवादी क्र. 1 यांचा काहीही संबंध नाही. तसेच सदर प्रकरणात कोणती चौकशी झालेली नाही. तसेच कार्यालया मार्फत कोणतेही पत्र निर्गमित केलेले नाही. जो पर्यंत सदर प्रकरणात आपल्या कार्यालयाकडून चौकशी होत नाही. आणि तसा अहवाल सादर होत नाही. त्यामुळे ही जी प्रोसेंडींग चालू आहे ती कायद्याच्या विसंगत आणि बेकायदेशिर आहे. तसेच प्रतिवादी क्र. 1 वारसदार यांच्यात कोणतीही सावकारी बाबत व्यवहार झालेला नाही. जे काही अर्जदाराने आपल्या तक्रारीत आरोप केलेले आहे हे संपूर्ण खोटे असून त्या आरोपात तथ्य नाही. व सर्व आरोप कायद्याच्या विसंगत आहे. म्हणून अर्जदारानी केलेली तक्रार ही दंड लावून फेटाळण्यात यावी अशी विनंती केली आहे.

REGISTRAR OF MONEY LENDERS DIST. AURANGABAD

तद्नंतर दि.29.1.2016 च्या सुनावणीच्या वेळी गैरअर्जदार क्र. 2 यांच्या वतीने अॅड.सुर्यवंशी व गैरअर्जदार क्र. 3 यांच्या वतीने अॅड.बीपीनचंद्र पाटील यांनी लेखी युक्तीवाद सादर केला. व म्हणने मांडले की, गैरअर्जदार क्र. 2 यांनी अर्जदाराची वादातील मिळकत श्री.गुरुप्रतापसिंग जाबींदा व राजपालसिंग जाबींदा यांचेकडून खरेदी केल्याचे खरेदीखत दि.01.09.1999 ची प्रत सादर केली. तसेच गैरअर्जदार क्र. 2 यांच्या इंकमटॅक्स बाबत झालेल्या चौकशीचे कागदपत्र सादर केले. अर्जदाराने खरेदी केलेली जमीन गैरअर्जदार क्र. 2 यांना सन 2004 मध्ये विक्री केली होती. व सदरची जमीन गैरअर्जदार क्र. 2 यांनी गैरअर्जदार क्र. 3 यांना सन 2006 मध्ये विक्री केलेली आहे. सन 2006 पासून गैरअर्जदार क्र. 3 हे सदर जमीनीचे मालक व कब्जेदार आहे. अर्जदाराने त्यांच्या अर्जा सोबत जो तथाकथीत जबाब दि.07.06.2013 चा दाखल केलेला आहे. तो गैरअर्जदार क्र. 2 यांचा नाही व त्या बाबत गैरअर्जदार क्र. 2 यांनी दि.15.09.2014 रोजी मा.पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांना लिगल नोटीस पाठवून तक्रार केलेली आहे. त्यामुळे दि.07.06.2013 चा तथाकथीत जबाब ग्राह्य धरण्यात येऊ नये व सदरचा जबाब साक्षीपूरावा कायदा 1872 चे कलम 1 व 3 नुसार प्रस्तुत प्रकरणात वाचता येणार नाही किंवा ग्राह्य धरता येणार नाही. इतर कायदेशिर मुद्दयाचा युक्तीवाद लेखी युक्तीवादा मध्ये नमुद केलेला आहे तो ग्राह्य धरण्यात यावा असे सुनावणीचे वेळी म्हणने सादर केले व सदर

सुनावणीस अर्जदार व गैरअर्जदार यांचे लेखी म्हणने व युक्तीवाद पुर्ण झालेले असल्याने सदर प्रकरण निर्णयास्तव बंद करण्यात आलेले होते.

अर्जदार यांनी त्यांचे लेखी म्हणने त्यांचे अभियोक्ते अॅड.पी.डी.सुर्यवंशी यांच्या मार्फत झालेल्या सुनावणीचे वेळी सादर केलेले असून त्यात तक्रार अर्जातील नमुद माहिती नमुद केलेली आहे. तसेच त्यात त्यांनी नमुद केले की, अर्जदार व गैरअर्जदार यांच्यात जमीनीचे झालेले खरेदी खत हे सावकारी व्यवहारा अंतर्गत असल्याने व ते खरेदीखत गैरअर्जदार क्र. 2 यांनी परत पलटवून देण्यास नकार दिल्याने अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्या विरुध्दात वेळोवेळी तक्रार दाखल केलेल्या आहेत. गैरअर्जदार क्र. 2 यांनी दि.07.06.2013 रोजी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गुन्हे शाखा औरंगाबाद यांचे समोर सत्य घटनेवर जबाब दिला असून त्यात त्यांनी नमुद केले आहे की, गट न.117 मधील बाभुळगांव येथील शेतजमीनीचे खरेदीखत हे सावकारी अंतर्गत झालेले आहे. त्या नुसार त्यांनी दि.04.07.2015 रोजी या प्राधिकरणाकडे प्रकरण दाखल केलेले आहे. गैरअर्जदार यांचे घर झडती मध्ये पोलीस प्रशासन यांनी गैरअर्जदार यांचे घरातुन 70 दस्तऐवज जप्त केलेले असून त्या मध्ये खरेदीखत, करारनामे, चेकबूक, पासबूक, 7/12 उत्तारे हे वेगवेगळया प्रकरणाशी व अनेक लोकाशी संबंधीत आहे. त्या नुसार त्यांचे विरुध्द गुन्हा रजिस्टर न.II 3012/2015 दि.01.07.2015 हा महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 चे कलम 39, 45 आणि 48 अंतर्गत दाखल झालेला आहे. त्यामुळे अर्जदाराच्या विरुध्द गुन्ह्या बाबतचे भक्कम पुरावे असल्याने या प्रकरणात त्यांचा सहभाग आहे. अर्जदार यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी असून त्यांनी श्री.बुंदेले शासकिय कर्मचारी यांच्यावर हल्ला केल्याने त्यांचे विरुध्द क्रांतीचौक पोलीस स्टेशन येथे आयपीसी अंतर्गतचे कलम 332, 353, 323, 505, 506, 294 व मुंबई पोलीस अॅक्ट चे कलम 142 आणि 135 (37/1) गुन्हा दाखल असून त्यांना मा.ज्युडीशीएल मॅजीस्ट्रेट औरंगाबाद यांनी त्यांचे दि.10.09.2013 चे आदेशा नुसार वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षा वरील गुन्ह्यात दिलेल्या आहे. त्यामध्ये आयपीसी 353 अंतर्गत 2 वर्षे कैद व रु.2000/- दंड 323 नुसार एक वर्ष कैद व 1000/- रुपये दंड, 294 नुसार 3 महिने कैद व 300/- रुपये दंड, व बॉम्बे पोलीस अॅक्ट चे कलम 142 नुसार दोन वर्ष कैद व 2000/- रुपयाची दंडाची शिक्षा थोटावलेली आहे.

तसेच या प्राधिकरणात सावकारी अंतर्गत निर्णय देण्याचे अधिकार असल्याने अर्जदार यांनी सदर प्रकरण दाखल केलेले असून त्या मध्ये अर्जदाराचा अर्ज मंजूर करावा व बाभुळगांव येथील गट न.117 मधील 0.81 आर.जमीनीचे खरेदीखत हे सावकारी अंतर्गत गहाण खत असल्याने अवैध घोषीत करावे व रद्द करावे. जमीनीचा ताबा अर्जदार यांना द्यावा अशी विनंती केलेली आहे.

गैरअर्जदार क्र. 1 यांनी त्यांचे लेखी म्हणने त्यांचे अभियोक्ते अॅड.एम.आर.चौधरी यांचे मार्फत सादर केले असून त्यात त्यांनी असे नमुद केले आहे की, अर्जदार यांनी दाखल केलेला दावा हा चालविणे योग्य नाही. कारण गैरअर्जदार क्र. 1 यांनी ही जमीन खरेदी केलेली नाही. अर्जदाराचा अर्ज हा वेळेच्या आत नाही. अर्जदार यांनी त्यांची

जमीन गैरअर्जदार क्र. 2 यांना सन 2004 मध्ये विक्री केलेली आहे. व 11 वर्षा नंतर त्यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये निलंबाचे कारण नमुद केलेले नाही. या प्रकरणात महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 चे कलम 15 व 16 नुसार चौकशी झालेली नाही. अर्जदार यानी ही जमीन दि.10.11.2004 च्या नोंदणीकृत खरेदीखता नुसार गैरअर्जदार क्र. 2 यांना विक्री केलेली आहे. त्या खरेदीखतात कोणतीही शर्थ नमुद केलेली नाही. या खरेदीखता नुसार गैरअर्जदार यांचे मालकी हक्कात 7/12 मध्ये नोंद झालेली आहे. अर्जदार यांनी दाखल केलेला सदरचा अर्ज हा त्रास देण्याच्या उद्देशाने व बेकायदेशिर रक्कम वसुल करण्याच्या उद्देशाने दिलेला आहे. या प्रकरणी अर्जदार यांनीं मा.मुख्य न्यायाधिश औरंगाबाद यांच्या समोर सदर वाद हा सदर प्रकरण हे सावकारी अंतर्गत असल्याने तक्रार अर्ज दाखल केल्याने त्या मध्ये मा.न्यायालयाने चौकशीचे आदेश दिले होते. त्या नुसार मा.न्यायालयाने या प्रकरणी उस्मानपुरा पोलीस स्टेशन यांना चौकशी करणे बाबत आदेशित केले होते. त्या नुसार पोलीस अधिकारी यांनी जाब जबाब घेऊन व रेकॉर्ड पाहून दि.03.10.2013 रोजी अहवाल सादर केलेला असून या मध्ये सावकारी बाबतचा पुरावा नसल्या बाबत अहवाल सादर केलेला आहे. या अहवाला विरुध्द अर्जदार यांनी कोठेही दाद मागीतली नाही. तद्नंतर अर्जदार मा.गृहमंत्री यांना दि.12.02.2014 रोजी तक्रार दिल्याने त्या मध्ये मा.गृहमंत्री यांनी चौकशीचे आदेश दिले होते. त्या नुसार चौकशी होऊन या मध्ये दि.21.02.2014 रोजी अहवाल सादर केला आहे. त्यामध्येही याप्रकरणी अवैध सावकारी सिध्द झालेली नाही. असा अहवाल सादर झालेला असून तो मा.पोलीस आयुक्त यांनी स्विकृत केलेला आहे. त्या नंतर अर्जदार यांनी पुन्हा या प्रकरणी तिसऱ्यांदा जवाहर पोलीस स्टेशन औरंगाबाद मध्ये सन 2015 ला तक्रार केली असून त्या मध्ये गैरअर्जदार यांच्या विरुध्द पोलीस गुन्हा नोंद झालेला आहे. या बाबत अर्जदार यांनी मा.उच्च न्यायालयात सदर एफ.आय.आर.विरुध्द दाद मागीतली असून त्या मध्ये मा.न्यायालयानी दोषारोप पत्र सुनावणी पुर्ण होई पर्यंत सादर करू नये. असे अंतरीम आदेश दिले आहे. गैरअर्जदार क्र.1 सदर मालमत्तेशी संबंधीत नाही. गैरअर्जदार क्र. 3 हे गैरअर्जदार क्र. 1 चा मुलगा असून त्यांनी सदरची जमीन खरेदीद्वारे गैरअर्जदार क्र. 2 कडून खरेदी केलेली आहे. हे विचारात घेऊन अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्या विरुध्द खोटी तक्रार केलेली आहे. गैरअर्जदार क्र. 3 हे गैरअर्जदार क्र. 1 पासून 10 ते 15 वर्षा पासून विभक्त राहात आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. 1 हे या व्यवहाराशी संबंधीत नाही. अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज हा सदर कायद्या नुसार चालविणे योग्य नाही. तसेच या प्रकरणी कोणतीही चौकशी झालेली नाही. त्यामुळे या प्रकरणी सुरु असलेली प्रक्रिया ही कायदेशिर नाही. अर्जदार हे गैरअर्जदार क्र. 1 यांना भेटलेले नसून त्यांनी रु.1.00 लाख ची मागणी केलेली नाही. व गैरअर्जदार क्र. 1 यांनी त्यांना गट न. 117 ची जमीन त्यांच्या नावाने वर्ग करणे बाबत सांगीतलेले नाही. गैरअर्जदार क्र. 1 हे 2 शी संबंधीत नाही. तसेच गैरअर्जदार क्र. 1 यांनी रु.1.00 लाख देऊन सदरचे खरेदीखत हे क्र. 2 च्या नावाने करून दिले ही माहिती पूर्ण खोटी आहे. तसेच अर्जदार हे गैरअर्जदार क्र. 2 यांच्याकडे पैसे परत करण्या करीता भेटले असता त्यांनी सांगीतले की, गैरअर्जदार क्र. 1 यांच्या सुचने नुसार सदरची जमीन गैरअर्जदार क्र. 3 यांच्या नावाने करुन दिलेली आहे. ही माहिती खोटी आहे. अर्जदार यांनी करुन दिलेले

दि.10.11.2004 चे खरेदीखत हे अर्जदार व गैरअर्जदार क्र. 1 यांच्यात सावकारी अंतर्गत झालेले आहे हे खोटे आहे. अर्जदार यांनी दि.12.02.2014 रोजी मा.गृहमंत्री यांना तक्रार केली असून चौकशी अंती यामध्ये सावकारी बाबत पुरावा आढळून आलेला नाही असा अहवाल सादर केला आहे. त्याला अर्जदार यांनी कोठेही आव्हान दिलेले नाही. त्या नंतर अर्जदार यांनी पुन्हा दि.01.07.2015 रोजी गैरअर्जदार यांचे विरुध्द खोटी तक्रार जवाहर नगर पोलीस स्टेशन येथे दाखल केलेली आहे. गैरअर्जदार क्र. 2 यांचा दि.07.06.2013 रोजी दिलेला जबाब खरा नाही व तो त्यांनी दिलेला नाही. व त्यातील माहिती खरी नाही. त्या नुसार गैरअर्जदार क्र. 2 यांनी दि.15.09.2014 नुसार पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांना कायदेशिर नोटीस निर्गमित केली आहे. गैरअर्जदार क्र. 2 यांनी सदरची जमीन खरेदीखता नुसार रु. 75000/- मध्ये खरेदी केलेली असून ती रक्कम त्यांनी घेतलेली असून तेव्हा पासून जमीनीचा ताबा गैरअर्जदार क्र. 2 यांना दिलेला आहे. अर्जदार यांनी दि.04.07.2015 रोजी दाखल केलेला अर्ज हा 11 वर्षा नंतर दाखल केलेला आहे त्यामुळे तो चालविणे योग्य नाही. गैरअर्जदार यांच्या घरझडती मध्ये कोणतेही बेकादेशिर दस्त जप्त केलेले नाही. गैरअर्जदार यांच्या विरुध्द पोलीस अधिकारी यांनी हेतुपुरस्कर खोट्या गुन्ह्याची नोंद केलेली आहे. त्यामुळे सदर प्रकरणात या प्रकरणी निर्णय घेण्याचे अधिकार नाही. अर्जदार यांनी खोटा अर्ज दाखल केला असल्याने तो खारीज करण्यात यावा. असे लेखी म्हणने सादर केले आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS

गैरअर्जदार क्र. 2 यांनी त्यांचा लेखी युक्तीवाद त्यांचे अभियोक्ते ॲड.के.जे.सुर्यवंशी यांचे मार्फत सादर केला असून त्यात त्यांनी नमुद केले आहे की, शेतकरी अर्जदार / तक्रारदार यांचा गुत्तेदारीचा व्यवसाय असून शेती हा व्यवसाय नाही. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 हा कायदा शेतकारी यांची सावकारी मार्फत आर्थिक पिळवणूक थांबवणी कामी तयार करण्यात आला असून या कायद्याचा मुळ हेतु व उद्देश देखील शेतकारी वर्गाची सावकारा मार्फत होणारी आर्थीक पिळवणूक थांबविणे हाच होता व आहे. अर्जदार यांचा गुत्तेदारीचा व्यवसाय आहे. त्यांचा शेती व्यवसाय आहे असे अर्जात कोठेही लिहिलेले नाही. तसेच अर्जदार यांचे खोट्या नाट्या कामामुळे त्यांचे नाव गुत्तेदारांच्या काळ्या यादीत समाविष्ट केलेले आहे. त्यांच्या विरुध्द बऱ्याच फौजदारी व दिवाणी स्वरुपाचे प्रकरण प्रलंबीत असून त्यांचे जप्तीची रक्कम बँकेकडे जमा करावयाचे असल्या कारणाने उत्तरार्थी यांना वेठीस धरणे कामी व त्यांचेकडून खंडणी वसुल करता यावी म्हणून सदरील अर्ज दाखल केलेला आहे. तो वाईट हेतुने प्रेरीत असून तो मुदत बाह्य आहे. सावकारी कायदा हा 2014 रोजी अस्तीत्वात आला असून तो 11 वर्षा पूर्वीचे नोंदणीकृत खरेदीखता मध्ये झालेल्या व्यवहारास आव्हानीत करण्यास मुभा देणारा नसून केवळ ताबे गहाण झालेल्या व्यवहारास आव्हानीत करण्याची मुभा देणारा आहे. सदरील तक्रार ही या कायद्याने चालविता येणार नाही. अर्जदार यांनी दि.10.11.2004 रोजी नोंदणीकृत खरेदीखत केल्याचे मान्य केले असून दस्त नोंदणी नंतर कसल्याही प्रकारची तक्रार न करता 11 वर्षा नंतर अचानक पणे त्यांनी अशी तक्रार करण्याचा काहीही एक हक्क व अधिकार नाही. सदर अर्जात कर्ज रक्कम, व्याज दर, व्यवहार कधी झाला, व्याज किती परत केले, कर्ज किती परत केले या बाबत उहापोह तक्रारीत नाही. अर्जात विदीत

केल्याने गैरअर्जदार क्र. 1 व 2 यांचे संबंध स्पष्ट होत नाही. तसेच गैरअर्जदार क्र. 2 हे सावकार असल्याचे सिध्द होत नाही. अर्जदार हे गैरअर्जदार 1 यांच्याकडे गेले किंवा कसे या बाबत गैरअर्जदार क्र. 2 यांना माहित असण्याचा काहीही एक संबंध नाही. अर्जदार यांनी गैरअर्जदार क्र. 1 यांच्याकडून रु.1.00 लाख घेतले व त्यांच्या सांगण्या वरुन त्यांनी गैरअर्जदार क्र. 2 यांच्या पक्षात खरेदीखत करून दिले हे विधान अंत्यत खोटे आहे. साक्षीपूरावा कायदा 1872 चे कलम 1 व 3 नुसार या जबाबावर अर्जदार यांना आग्रह धरता येणार नाही. तसेच कलम 1 नुसार दुसऱ्या चौकशीतील जबाबावर साक्षीपुराव्यावर तसेच प्रतिज्ञापत्र या प्रकरणात वाचण्यास परवानगी नाही व मुभा नाही. अर्जदार यांच्या अर्जातील अर्जा मध्ये गैरअर्जदार क्र. 2 यांनी सावकारी व्यवहार केला हे सिध्द होत नाही. पोलीसानी चौकशी केली नाही. अर्जदार अपंग असणे या मजकुरामुळे गैरअर्जदार क्र. 2 सावकार असल्याचे सिध्द होत नाही. चौकशी अंती दिवाणी स्वरुपाचा वाद असल्याचा निष्कर्ष नोंदविला आहे. तसेच पोलीसानी व्यवस्थीत चौकशी केली नाही किंवा कसे या बाबतची तक्रार या प्राधिकरणा समोर करण्याचे काहीही एक कारण नाही. या प्रकरणी चौकशी अंती दिवानी स्वरुपाचा वाद असल्याचा निष्कर्ष पोलीसानी नोंदविला असून प्रकरण फेब्रुवारी 2014 मध्ये निकाली काढल्याचे अर्जदारास कळविले आहे. नोंदणीकृत खरेदीखत रद्द करण्याचा अथवा गहाण खत घोषीत करण्याचा कसलाही हक्क महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 अंतर्गत प्राप्त होत नाही. प्राथमिक आक्षेपा नुसार सदर अर्ज खारीज होणेस पात्र आहे. गैरअर्जदार क्र. 2 हे कसल्याही प्रकारचा सावकारी धंदा करीत नाही. सदरचा कायदा हा सावकारी धंदा करण्यासाठी परवाना घेतलेल्या तसेच न घेतलेल्या व्यक्ती सावकारी धंदा करीत असल्यास त्यांच्या विरुध्दात कार्यवाही करण्यासाठी आहे. गैरअर्जदार क्र. 2 हे महाराष्ट्र सावकारी (नियमन) कायदा 2014 चे कलम 2 चे उपकलम 3,9,11,13,14 मध्ये दिलेल्या सावकाराच्या व्याखेत संज्ञेत बसत नाही. त्यांनी कोणासही व्याजाने पैसे दिलेले नाही. तसेच त्यांचा सावकारी धंदा परवाना नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र. 2 हे नोंदणीकृत सावकार नव्हते व नाही. गैरअर्जदार क्र. 2 यांच्या विरुध्दात महाराष्ट्र सावकारी (नियमन) कायदा 2014 कलम 16 व 17 अन्वये कसल्याही प्रकारची चौकशी करण्यात आलेली नाही, झालेली नाही. त्यामुळे कलम 18 अन्वये आदेश पारीत करण्याची सक्षमता या प्राधिकरणास प्राप्त होत नाही. व त्यांच्या विरुध्दात कसल्याही प्रकारचे आरोप व तक्रार नसताना त्यांच्या विरुध्द चौकशी करण्याचा हक्क व अधिकार उक्त कलमाचे 17 व 18 नुसार प्राप्त होत नाही. तसेच अर्जदार यांचेशी गैरअर्जदार यांचा खरेदीखता व्यतिरिक्त कसलाही संबंध आलेला नाही. महाराष्ट्र सावकारी (नियमन) कायदा 2014 कलम 17 मध्ये "ताबे गहाण" या शब्दाचा वापर करण्यात आला असून नोंदणीकृत खरेदीखत या शब्दाचा वापर नाही. तसेच पुराव्या अंती व्याजापोटी घेतलेल्या रक्कमेची परतफेड करणे कामी परताव्याची हमी म्हणून दस्त करून दिला असल्यास असा दस्त ताबा घेण्याचा हक्क व अधिकार प्राप्त होत असून कलम 18 अन्वये सदरील ताबे गहाण या मथळ्या खाली दिलेली मिळकत परत करण्याचा अधिकार व हक्क प्राप्त होतो. विवादीत मिळकतीचे विस्तृत वर्णन प्रकरणात लिहिलेले नाही. चतु:सिमा लिहिलेल्या नाही. प्रस्तुत प्रकरणात दुय्यम निबंधक यांचे समोर नोंदणीकृत खरेदीखत करून दिलेले असून नोंदणी कायदा 1908

REGISTRAR OF MONEYLENDERS DIST. AURANGABAD

नुसार आवश्यक ती नोंदणी प्रक्रिया पुर्ण केल्या नंतर सदरील दस्त नोंदणी झाला आहे. तो दस्त नोंदणीकृत असून ताबे गहाणखत नाही. अर्जदार यांनी 11 वर्षा नंतर दाखल केलेल्या अर्जास महत्व दिल्यास कायदा विरोधी होईल. या कायद्या मध्ये नोंदणीकृत खरेदीखत ताबे गहाण खत असल्याचे घोषीत करण्या बाबत देखील प्रावधान नाही. गैरअर्जदार यांचे विरुध्द दाखल गुन्ह्या मध्ये मा.उच्च न्यायालयाने आरोप पत्र दाखल करू नये असे अंतरीम आदेश पारीत केलेले आहे. मालमत्ता हंस्तातरण कायदा कलम 58 नुसार अर्जदार यांना असा मुद्दा उपस्थित करण्याचा अधिकार व हक्क राहात नाही. गैरअर्जदार यांनी व्याजाने दिलेल्या रक्कमेची परताव्याची हमी म्हणून सदरील खरेदीखत झालेले नाही. अर्जदार यांचे तथाकीत कथनामुळे गैरअर्जदार क्र. 2 हे सावकार आहेत. असे आरोप सिध्द केले जाऊ शकत नाही. अर्जदार यांनी वाईट हेतुने प्रेरित होऊन सदरचा अर्ज दाखल केलेला असल्याने फेटाळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

गैरअर्जदार क्र. 3 यांनी त्यांचे म्हणने गैरअर्जदार क्र. 2 नुसार सादर केलेले असून या व्यतिरिक्त त्यांचे म्हणण्यात पुढील बाबी नमुद करण्यात आलेल्या आहे. त्या नुसार अर्जदार यांचे अर्जातील आरोपात केवळ अर्जदार क्र. 1 व 2 यांचे विरुध्दात असून गैरअर्जदार क्र. 3 यांचे विरुध्दात कसल्याही प्रकारचे सावकारी करीत असल्या बाबत आरोप नाहीत. गैरअर्जदार क्र. 2 यांचेकडून गैरअर्जदार क्र. 3 यांनी काही मिळकत खरेदी केली असून सदरील मिळकत ही गैरअर्जदार क्र. 2 यांनी कोणासही ताबे गहाण दिलेली नव्हती व नाही. गैरअर्जदार क्र. 3 हे महाराष्ट्र सावकारी (नियमन) कायदा 2014 चे कलम 2 चे उपकलम 3,9,11,13,14 मध्ये दिलेल्या सावकाराच्या व्याखेत बसत नाही. ते सावकार नाही. त्यांनी कोणासही व्याजाने पैसे दिलेले नाही. व त्यांनी कसल्याही प्रकारचा सावकारी धंदा परवाना घेऊन अथवा परवाना घेतल्या खेरीज केलेला नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द या कायद्या अन्वये कोणतीही चौकशी करता येत नाही. सदरील गैरअर्जदार क्र. 3 यांनी केलेले खरेदीखत हे व्याजाने दिलेल्या रक्कमेची परताव्याची हमी म्हणून खरेदीखत करुन घेतलेले नाही. गैरअर्जदार क्र. 3 हे सावकार आहे हे सिध्द होऊ शकत नाही. अर्जदार यांनी मानसिक हेतुच्या व त्रास देण्याच्या उद्देशाने तक्रार केलेली असून ती फेटाळण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

**उपरोक्त बाबी वरुन सुनावणी अंती व सुनावणीचे वेळी या प्राधिकरणा समोर प्राप्त झालेल्या दस्तएवजा नुसार पुढील मुद्दे निदर्शनास येतात. व त्या मुद्दयास अनुसरुन सुनावणी अंती त्याचे स्पष्टीकरण काय ? या बाबतचे मुद्दे व स्पष्टीकरण पुढील प्रमाणे आहे.**

**मुद्दा क्र. 1)** अर्जदार यांनी त्यांची बाभुळगाव शिवारातील गट न. 177 मधील 0.81 आर.शेतजमीन ही सावकारीच्या ओघात प्रतिभुती म्हणून दिलेली आहे काय ?

**मुद्दा क्र. 2)** अर्जदार यांनी त्यांची बाभुळगांव शिवारातील गट न.177 मधील 0.81 आर.शेतजमीन ही गैरअर्जदार क्र. 1 सावकार यांचे सांगीतल्या वरुन गैरअर्जदार क्र. 2 यांचे नावाने प्रतिभुती म्हणून दिलेली आहे काय ?

**मुद्दा क्र. 3)** मुद्दा क्र. 1 व 2 चे उत्तर होयअसल्यास सदर जमीनीचे खरेदीखत अवैध घोषीत करून ही जमीन मुळ जमीन हस्तांतरणकार यांना परत करणे योग्य आहे काय ?

सुनावणी च्या वेळी प्राप्त दस्तऐवज व म्हणने एकुण घेता सदरील तीनही मुद्दयाचे उत्तर होकारार्थी असून त्या बाबतचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे आहे.

**गैरअर्जदार क्र. 2 श्री.शंकर सदाशिवराव भैरव** यांनी चौकशीचे वेळी दि.07.06.2013 रोजी श्री.एस.आर.खंडागळे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक यांचे समक्ष जबाब लिहून दिलेला आहे. त्या जबाबात पुढील माहिती कथन केलेली आहे. ते शिवनेरी अपार्टमेंट, फ्लॅट न. 8 खडकेश्वर ,औरंगाबाद मो.न.9422293554 येथील रहिवाशी असून त्यांची पत्नी सौ.उषा शंकर भैरव ह्या शासकिय वैद्यकिय महाविद्यालय तथा रुग्णालय घाटी औरगाबाद येथे वार्ड इनचार्ज या पदावरुन सेवानिवृत्त झाल्या आहेत. ते काहीही कामधंदा करीत नसुन पत्नीच्या सेवानिवृत्तीच्या वेतनावर व मुलगा करीत असलेल्या खाजगी कंपनीतील नोकरीच्या उत्पन्नावर त्यांची व त्यांच्या कुटुंबाची उपजिवीका चालवितात. त्यांना उत्पन्नाचे इतर ठोस साधन नाही. अर्जदार श्री.सुखबीरसिंग दिवानसिंग चंडोक यांचे अर्जा नुसार त्यांनी जबाबात सांगीतले की, गैरअर्जदार श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल (पपीसेठ) यांचा सावकारीचा व्यवसाय आहे. ते औरंगाबाद शहरातील गरजू लोकाना व्याजाने पैसे देतात ते त्यांचे चांगले मित्र आहेत. अर्जदार यांना पैशाची गरज असल्यामुळे त्यांनी गैरअर्जदार क्र. 1 यांचेकडून रु.1.00 लाख द.सा.द.शे.5 रु. प्रमाणे व्याजाने घेतले होते. त्या बदल्यात अर्जदार यांनी त्यांची बाभुळगांव ता.पैठण येथील गट नं.117 मधील 2 एकर शेतजमीनीचे खरेदीखत क्र.5359/2004 दि.10.11.2004 नुसार त्यांच्या नावाने करुन घेतले होते. व सदरचे खरेदीखत हे गैरअर्जदार क्र. 1 श्री.नरेंद्रसिंग छतवाल यांनी अर्जदार श्री.सुखबीरसिंग चंडोक यांना रु.1.00 लाख व्याजाने दिलेल्या पैशाच्या मोबदल्यात करुन घेतले होते. खरेदीखत करून घेताना अर्जदार हे घेतलेली रु.1.00 लाख मुळ रक्कम व्याजासह त्यांचा मित्र गैरअर्जदार श्री.नरेंद्रसिंग छतवाल यांना परत करतील त्यावेळी सदर जमीनीचे खरेदीखत अर्जदार यांचे नावाने करुन देण्याचे ठरले होते. अर्जदार यांनी घेतलेल्या रु.1.00 लाख रक्कमे पेकी व्याजासह गैरअर्जदार यांना किती रक्कम परत केली हे त्यांना सांगता येणार नाही परंतु त्यांचे मित्र गैरअर्जदार क्र.1श्री नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल यांनी त्यांना सांगीतले की, अर्जदार हे वेळेवर पैसे देत नसल्याने सदरची जमीन त्यांचा मुलगा गैरअर्जदार क्र. 3 श्री.अजितसिंग नरेंद्रसिंग छतवाल यांच्या नावाने करुन देण्यास सांगीतल्याने सदर जमीन खरेदीखत क्र.1973/2006 दि.01.04.2006 अन्वये श्री.अजितसिंग नरेंद्रसिंग छतवाल यांच्या नावाने करून दिलेली आहे. खरेदीखतामध्ये जमीनीची किमंत नावापूरती दाखविलेली आहे. प्रत्यक्षात त्यांनी जमीनीचा मोबदला घेतलेला नाही. कारण ह्या जमीनीचे खरेदीखत गैरअर्जदार क्र. 1 यांच्या सांगीतल्या नुसार अर्जदार श्री.सुखबिरसिंग दिवानसिंग चंडोक यांच्या जमीनीचे खरेदीखत त्यांच्या नावाने करुन घेतले होते. त्यावेळी सुध्दा खरेदीखतात नमुद केलेली जमीनीची रक्कम त्यांनी घेतलेली नाही. अर्जदार श्री.सुखबीरसिंग दिवानसिंग चंडोक यांच्या मालकीच्या मौजे बाभुळगांव ता.पैठण येथील गट नं.117 मधील 2 एकर जमीनीची खरेदीखत हे सावकारी व्यवहारातुन झालेले आहे. प्रत्येक्षात जमीनीचा मोबदला त्यांनी घेतलेला नाही. सदर खरेदीखत हे दुय्यम निबंधक पैठण यांच्या कार्यालया नोंदविलेले आहे. अर्जदार यांनी गैरअर्जदार क्र. 1 यांच्याकडून रु.1.00 लाख व्याजाने घेतले होते.

व्याजाने घेतलेल्या पैशाचा व्यवहार हा औरंगाबाद येथे घडलेला आहे. नमुद जमीनीशी त्यांचा सबंध नाही. गैरअर्जदार क्र.1 यांच्या सांगीतल्या नुसार जमीन त्यांच्या नावाने करून घेतली होती. व त्यांच्या सांगीतल्या वरुन त्यांचा मुलगा गैरअर्जदार क्र. 3 श्री.अजिसिंग नरेंद्रसिंग छतवाल यांच्या नावाने जमीन करुन दिलेली आहे असा जबाब सादर केलेला आहे.

तसेच गैरअर्जदार क्र. 1 यांनी त्यांचे लेखी म्हणने मध्ये नमुद केले आहे की, त्यांचा व गैरअर्जदार क्र. 3 चा काहीही संबंध नाही ते 10 ते 15 वर्षा पासून विभक्त राहातात. ही बाब विचारात घेता येत नाही. कारण गैरअर्जदार क्र. 3 हे गैरअर्जदार क्र. 1 चे चिरंजीव आहेत.व विवादीत जमिन गैरअर्जदार क्र.2 यांनी गैरअर्जदार क्र.1 चे चिरंजिव गैरअर्जदार क्र.3 श्री.अजितसिंग नरेंद्रसिंग छतवाल यांनाच का विक्री करावी हे संशयास्पद आहे,त्यामुळे अर्जदारांचा व्यवहार हा अवैध सावकारीचा आहे,हे सकृतदर्शनी दिसुन येत आहे.

त्यामुळे गैरअर्जदार क्र.2 श्री.शंकर सदाशिवराव भैरव यांनी त्यांचे जवाबात असे कबुल केले आहे की,अर्जदार श्री.सुखबिरसिंग दिवानसिंग चंडोक व गैरअर्जदार क्र.1 श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल यांचेतील व्यवहार हा शेतजमिन खरेदीविक्रीचा नसुन सावकारीचा आहे.या सावकारी व्यवहारात गैरअर्जदार क्र.1 श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल यांचे सांगीतल्यानुसार त्यांनी अर्जदार श्री.सुखबिरसिंग दिवानसिंग चंडोक यांची मौजे बाभुळगांव ता.पैठण जि.औरंगाबाद येथिल गट नं.117 मधील 81 आर शेतजमिन खरेदीखत क्रमांक 5359/2004 दिनांक 10/11/2004 नुसार त्यांचे स्वत:चे नावाने लिहुन घेतलेली आहे.या शेतजमिनीचा मोबदला त्यांनी अदा केलेला नाही.तदनंतर पुन्हा गैरअर्जदार क्र.1 श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल यांचे सांगीतल्याप्रमाणे हिच शेतजमिन मौजे बाभुळगांव ता.पैठण जि.औरंगाबाद गट नं.117 मधील 81 आर पुन्हा गैरअर्जदार क्र.1 श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल यांचा मुलगा गैरअर्जदार क्र.3 श्री.अजितसिंग नरेंद्रसिंग छतवाल यांचे नावाने खरेदीखत क्र.1973/2006 दिनांक 01/04/2006 नुसार करुन दिलेली आहे.या वेळेही शेतजमिनीचा मोबदला त्यांना मिळालेला नाही.

त्यामुळे अर्जदार श्री.सुखबिरसिंग दिवानसिंग चंडोक यांनी गैरअर्जदार क्र.1 श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल यांचे सांगितल्यानुसार गैरअर्जदार क्र.2 श्री.शंकर सदाशिवराव भैरव यांचे नावाने लिहुन दिलेली वरील नमुद शेतजमिन ही सावकारी व्यवहारातील रक्कमेस धर/गहाणखत म्हणुन खरेदीखताव्दारे लिहुन दिलेली आहे.हे स्वत:गैरअर्जदार (ज्यांचे नावे खरेदीखत केले होते.) क्र.2 श्री.शेकर सदाशिवराव भैरव यांनी त्यांचे स्वत: जवाबामध्ये मान्य केलेले आहे.त्यामुळे ह्या शेतजमिनीचे खरेदीखत हे सावकारीत झाले ही बाब स्पष्ट होते.

त्यामुळे अर्जदार यांनी खरेदी खताद्वारे लिहून दिलेली जमीन ही सावकारीच्या ओघात गहाणखत प्रतीभूती म्हणून लिहून दिल्याचे सिध्द आहे. त्यामुळे हे खरेदीखत क्र. 5359/2004 दि.10.11.2004 च तद्नतंरचे खरेदीखत क्र.1973/2006 दि.01.04.2006 हे दोन्ही खरेदीखत सावकारीचे ओघात झाले असल्याने अवैध घोषीत करून सदरील मौजे बाभुळगांव ता.पैठण जि.औरंगाबाद येथील गट नं.177 मधील 81 आर.शेतजमीन मुळ हंस्तातरणकार

अर्जदार श्री.सुखबीरसिंग दिवानसिंग चंडोक यांना परत करणे आवश्यक असले बाबत माझी खात्री झालेली असल्याने या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यांत येत आहे.

## आदेश

मी, एन.व्ही.आघाव सावकारांचे निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था औरंगाबाद, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 चे कलम 18 नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून अर्जदार श्री.सुखबीरसिंग दिवानसिंग चंडोक, रा.उस्मानपुरा, औरंगाबाद यांनी गैरअर्जदार क्र. 1 श्री.नरेंद्रसिंग प्रितमसिंग छतवाल, रा.शिवनेरी अर्पाटमेंट, फ्लॅट न.8 खडकेश्वर, औरंगाबाद ता.जि.औरंगाबाद यांचे सांगीतल्या वरुन मौजे बाभुळगांव ता.जि.औरंगाबाद येथील गट न.117 मधील 0.81 आर. शेतजमीनीचे खरेदीखत क्र.5359/2004 दिनांक 10.11.2004 रोजी गैरअर्जदार क्र. 2 श्री.शंकर सदाशिवराव भैरव रा.खडकेश्वर औरंगाबाद यांचे नावाने करुन दिलेले खरेदीखत व त्यानंतर गैरअर्जदार क्र. 2 श्री.शंकर सदाशिवराव भैरव यांनी गैरअर्जदार क्र. 3 श्री.अजितसिंग नरेंद्रसिंग छतवाल यांच्या नावाने करुन दिलेलें खरेदीखत क्र.1973/2006 दि.01.04.2006 हे दोन्ही खरेदीखत सावकारीच्या ओघात प्रतीभुती म्हणून करुन दिलेले असल्याने सदर खरेदीखत अवैध असल्याचे घोषीत करीत असून ते खरेदीखत याद्वारे रद्द करून सदर शेतजमीन ही महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 चे कलम 18 अन्वये मुळ मालक हस्तांतरणकार श्री.सुखबीरसिंग दिवानसिंग चंडोक रा.उस्मानपुरा औरंगाबाद यांना परत करीत आहे.

सदर आदेश आज दिनांक 30/03/2016 रोजी माझे सही व कार्यालयाच्या मुद्रेसह पारीत केला आहे.

(एन.व्ही.आघाव)
सावकाराचे जिल्हा निबंधक
तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था औरंगाबाद

प्रत :-

1) मा.उपविभागीय अधिकारी, ता.औरंगाबाद यांना पुढील कार्यवाहीस्तव व माहितीस्तव.
2) मा.तहसिलदार, ता.पैठण यांना पुढील कार्यवाहीस्तव व माहितीस्तव.
3) तलाठी सजा,बाभुळगांव ता.पैठण यांना देऊन कळविण्यांत येते की,उक्त प्रकरणात योग्य ती कार्यवाही करावी.
4) उपनिबंधक सहकारी संस्था ता.औरंगाबाद यांना माहितीस्तव रवाना.

**<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर.</u>**

1. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे.
2. मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद.

सावकाराचे जिल्हा निबंधक
तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था औरंगाबाद